# नोटीस बोर्ड
## कोटेशन
## सन २०२५-२०२६

दिनांक १०/०६/२०२५

याव्दारे कळविण्यांत येते की, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र झाडगांव व कोकणनगर ता. रत्नागिरी करिता बाहययंत्रणेद्वारे Attendant पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी ऑनलाईन कोटेशन मागविण्यात येत आहेत. सदर कोटेशन दिनांक १२/०६/२०२५ ते दि.२०/०६/२०२५ रोजी संध्या.४.०० वाजेपर्यंत सुटटीचा दिवस सोडून तालुका आरोग्य कार्यालय, ता. जि. रत्नागिरी येथे स्विकारले जातील व त्यानंतर आलेल्या कोटेशन चा विचार केला जाणार नाही. तसेच दि.२३/०६/२०२५ रोजी सायं.४.३० वाजता कोटेशन उघडण्यात येतील.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र झाडगांव व कोकणनगर येथे खालीलप्रमाणे पदे रिक्त आहेत.

| अ.क्र | प्रा.आ.केंद्र | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | झाडगांव | Attendant | १ |
| २ | कोकणनगर | Attendant | १ |

## निविदा अटी व शर्तीचा तपशील

१. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत नागरी प्रा.आ.केंद्र झाडगांव व कोकणनगर बाहयस्त्रोतादवारे Attendant भरावयाचे आहेत. तरी इच्छुक निविदा भरणा-यांनी आपली निविदा भरताना दोन लखोटे पद्धतीचा अवलंब करावा.

## Technical Documents No - 1

१. संस्थेचा नोंदणी दाखला.
२. सन –२०२२-२३,२०२३-२४,२०२४-२५ या आर्थीक वर्षाचे आयकर विवरण पत्र.
३. व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र.
४. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र.
५. कामगार भविष्य निर्वाह नोंदणी प्रमाणपत्र.
६. पॅन कार्ड
७. नोंदणीकृत कामगार कल्याणनिधी परवाना.
८. ATTENDANT पुरवठा करणा-या संस्थेचे/ लघु उद्योजकाचे कार्यक्षेत्र रत्नागिरी जिल्हा असलेचे सक्षम प्राधीकरणाचे प्रमाणपत्र तसेच संस्थेची उपविधी प्रत सादर करणे आवश्यक आहे.
९. मागील तीन वर्षात संबंधीत संस्थेने कंत्राटी पध्दतीने (शासकीय,निमशासकीय,सहकारी) संस्थेस ATTENDANT सेवा सुविधा अन्यत्र पुरविलेचा अनुभवाचा दाखला.
१०. सदर मनुष्यबळ पुरवठी करणारी संस्था शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत नाही या बाबतचे संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र ( रु.१०० च्या बॉण्ड पेपरवर)

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र झाडगांव व कोकणनगर येथे बाहयसंस्थेमार्फत उपलब्ध करुन घेण्यात येणाऱ्या कंत्राटीवर्ग ४ कर्मचारी**

**BOQ 2**

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| शासनाने वेळोवेळी विहीत केलेनुसार मदतनीस सेवा, स्त्री स्वयंपाकी व स्त्री परीचर यांना दयावयाचे स्थुल मानधन (प्रति कर्मचारी प्रति महीना | प्रशासकिय शुल्क (सेवा शुल्क/कमिशन)(प्रति कर्मचारी प्रति महीना) (रक्कम रुपयात) | एकूण रक्कम (रुपयात) (१ + २) | जीएसटी १८% | एकत्रित एकूण रक्कम (रुपयात) (३+ ४) |
| 12276/- | | | | |

अटी व शर्ती :

१) शासनाने वेळोवेळी विहीत केलेनुसार व प्राप्त मार्गदर्शक परीपत्रकानुसार सदरील कर्मचारी यांना दयावयाचे ठोक मानधन रु.१२२७६/- (निव्वळ मानधन रु.९४५२/- + ईपीएफ रु.२२३८/- + इंन्शुरन्स/ईएसआयसी रु.३७८ +LWF रु.८/- + प्रोफेशनल टॅक्स रु.२००/-) देणे आवश्यक आहे.

२) दरमहाचे दिनांक ०१ ते १० पर्यंत संबधीत कंत्राटी कर्मचारी यांचे मागील महाचे मानधन आरटीजीएस/एनईएफटीद्वारे सबंधीत कर्मचारी यांचे खात्यामध्ये वर्ग करणेत यावे. तसेच कायदेशीर व जातीचा भरणा संबधीत विभागांना केल्यानंतर त्याबाबतच्या चलनाच्या प्रती सादर केल्यानंतरच पुरवठादारास त्याबाबतची प्रतिपुर्ती करणेत येईल. सदरची चलन भरल्याशिवाय मासिक ठोक मानधन अदा केले जाणार नाही.

३) काही अपरिहार्य कारणास्तव सेवापुरवठादाराचे देयक अदा करण्यास विलंब होत असला तरी सेवापुरवठादाराने कर्मचाऱ्यांचे मानधन न थकवता विहीत वेळेत स्वनिधीतुन प्रदान करावे.

४) मा.अतिरिक्त अभियान संचालक, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक ०५.१०.२०२० तसेच मा.सहसंचालक (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांचे दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार बाहययंत्रनेकडून (आऊटसोर्सीगद्वारे) कामे करुन घेणेबाबत मार्गदर्शक सुचनानुसार **मानधनाची सर्व कर व सेवा शुल्कासह (पुरवठादाराचे कमिशन) होणारी एकूण रक्कम रु.१५५००/- (रुपये पंधरा हजार पाचशे मात्र) पेक्षा जास्त होणार नाही तसेच पुरवठादार/ठेकेदार यांनी त्यांचे प्रशासकिय शुल्क (सेवा शुल्क/कमिशन)(प्रति कर्मचारी प्रति महीना) किमान ३.८५ टक्के व कमाल ७ टक्के एवढा नमुद करावा असे न केल्यास संबधीत पुरठाधारकास निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.**

५) याबाबतीत काही वाद उद्‌भवल्यास महाराष्ट्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय पदनि-२०१८/प्र.क्र.३२८/आरोग्य३ दिनांक १७ मार्च २०२० हा आधारभुत राहील व त्यातील अटी व शर्तीना अधिन राहून निर्णय घेण्यात येईल.

२. नागरी प्रा.आ.केंद्र झाडगांव व कोकणनगर येथे Attendant सेवा सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत दयावी लागेल.

३. Attendant हे वैदयकीय दृष्टया पात्र व निर्व्यसनी असावेत.

४. Attendant हा कंत्राटदारामार्फत उपलब्ध होणार आहे त्यामुळे उपलब्ध करुन देण्यात येणा-या Attendant ची शैक्षणिक कागदपत्रांची चाचणी तालुका आरोग्य कार्यालय,रत्नागिरी यांचेकडून करणेत येईल.

५. Attendant ला गणवेश पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच कामावर असताना Attendant ने गणवेश परिधान करणे व गणवेशावर कंत्राटदाराने दिलेले ओळखपत्र लावणे बंधनकारक राहील.

६. बाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेल्या Attendant ला तालुका आरोग्य अधिकारी यांच्या परवानगीशिवाय बदलण्यात येऊ नये.

७. नागरी प्रा.आ.केंद्रातील वस्तू अथवा कोणत्याही प्रकारचे नुकसान अथवा वित्तहानी झाल्यास त्यामध्ये Attendant ची चूक असल्याचे निष्पन्न झाल्यास त्याची भरपाई कंत्राटदारांना दयावी लागेल.

८. बाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेल्या Attendant च्या कोणत्याही तक्रारी तालुका आरोग्य कार्यालयाकडे येणार नाहीत त्यांचे निवारण आपण आपले स्तरावरुन करुन अटी व शर्तीचे पालन होईल असे पहावे.

१०.वाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेले Attendant असमाधानकारक सेवा देत असतील तर ही बाब कंत्राटदारांच्या निदर्शनास आणणेत येईल, मात्र तरी सुदधा कामात सुधारणा न झाल्यास त्यांचेवर आपण आपले स्तरावरुन कारवाई करावी.

११.कंत्राटदारांच्या सेवा मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास कुठल्याही क्षणी निविदा रद्द करण्याची शिफारस वैदयकीय अधिकारी हे तालुका आरोग्य अधिकारी, रत्नागिरी यांचेकडे करतील.

१२.निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा वेगळा करणेत येईल. प्राप्त झालेल्या निविदेपैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर काही कारण न दाखवता नाकारण्याचा अधिकारी निम्न स्वाक्षरीकार यांना राखून ठेवण्यात येत आहे.

१३. वाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेले Attendant च्या सेवेची गुणवत्ता पडताळणी नागरी प्रा.आ.केंद्रातील वैदयकीय अधिकारी करतील.

१४.निविदाधारक संस्थेची निविदा मंजूर झाल्यानंतर मा.सहाय्यक मा.सहाय्यक कामगार आयुक्त रत्नागिरी यांचेकडून कामगार परवाना घेणे ही संस्थेची जबाबदारी राहील.

१५. वाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेले Attendant ची पदे मंजूर कृती आराखडा सन २०२५-२६ मध्ये मंजूर असल्याशिवाय कंत्राटदाराला नियुक्ती आदेश देता येणार नाहीत.

१६. वाहयस्त्रोतादवारे निवड करण्यात आलेले Attendant ची सेवा कंत्राटी स्वरुपाची राहील. नियमित सेवेसाठी त्यांना कोणत्याही प्रकारचा दावा न्यायालयात दाखल करता येणार नाही.

१७.सदर प्रकरणी न्यायालयीन वाद उदभवल्यास कार्यक्षेत्र जिल्हा सत्र न्यायालय रत्नागिरी राहील.

१८.दरपत्रके ठरवून दिलेल्या दिवशी व ठरवून दिलेल्या वेळेतच स्विकारण्यात येतील.

१९. सदर दरपत्रक तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कार्यालय रत्नागिरी ता.जि. रत्नागिरी या नावे सादर करावीत.

२०. दरपत्रक GST सहीत सादर करणेत यावे.

२१. मंजूर कोटेशन नुसार मनुष्यबळ पुरवठा आदेश दिल्यापासून सात दिवसांत करणे आवश्यक आहे.

२२.दरपत्रकातील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा बदल निर्माण झाल्यास तालुका आरोग्य अधिकारी, तालुका जिल्हा रत्नागिरी यांचा निर्णय अंतिम राहिल.

TALUKA HEALTH OFFICER RATNAGIRI.

तालुका आरोग्य अधिकारी
ता.रत्नागिरी, जि.रत्नागिरी